# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 04/05/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावर तारणा फाटा येथे दिनांक 03/05/2021 चे 20.30 वा.ते 21.00 वा. दरम्यान एमच–40/बीएल–2484 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी क्र– 1) सचिन घनश्याम डुंबे, वय 35 वर्ष, रा. सावंगी याने टिप्पर मालक नामे– आरोपी क्र. 2) प्रशांतजित उरकुडदास दहीवले, वय 45 वर्ष, रा. सिंदपुरी, ता. पवनी, जि. भंडारा याच्या सांगण्यावरून त्याच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या 5 ब्रास रेती किं. 20,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 25,20,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई मारोती राउत यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक पाटील 7585956458 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. सावनेर :– दि. 15/04/2014 चे 12:00 वा. ते दि. 02/05/2021 चे 20:30 वा. चे सुमारास 25 वर्षीय फिर्यादी ही आरोपी नामे– प्रतिक मोरेश्वर डाखोळे वय 30 वर्ष, रा. बाजार चौक सावनेर याला ओळखत नसतांना आरोपीने तिला प्रपोज केले होते. यानंतर आरोपीने फेसबुक मॅसेंजर वरून पीडितेस रिक्वेस्ट पाठवून तिला मॅसेज पाठवू लागला. तसेच आरोपी याने पीडितेचे बॅकेपासून घरापर्यंत पाठलाग केले. दि. 02/05/2021 रोजी आरोपीने पीडितेला मॅसेज करून लग्न तोडण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 (ड), 507 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि रासकर 9082196080 या करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. जलालखेडा – दिनांक 02/05/2021 चे 06.00 वा. चे सुमारास पो.स्टे. जलालखेडा हद्दीत फिर्यादी यांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हिला आरोपी नामे– राहुल पुंडलिक लाड, रा. थडीपवनी पुनर्वसन ता. नरखेड याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेल्याचे संशय असल्याने फिर्यादी यांचे रिपोर्टवरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री राजेन्द्र सोनवणे 7798801816 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर